जा.क्र.नांवाशमनपा/कोंडवाडावि/19/2025
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड
दिनांक 09.06.2025

**"जाहिरई-निविदा सुचना"**

**मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे**

**कोंडवाड्यात मोकाट जनावरे पकडून दाखल करण्याचे कामाचे निविदा अर्ज**

आयुक्त ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड महापालिका हद्दीत रस्त्यावर मोकाट /बेवारस फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाड्यात दाखल करणे,याकामासाठी विहीत नमुन्यात ऑनलाईननिविदा मागवित आहेत.

सदरील**ई**निविदा नोंदणीकृत स्वंयसेवी सेवाभावी संस्था महिला बचतगट,मजूर सहकारी संस्था ,सुशिक्षित बेरोजगार संस्था यांना यानिविदा फक्त महानगरपालिकेच्या वेबसाईट (https://mahatenders.gov.in) वरुन ऑनलाईन खरेदी करता येईल .निविदेच्या अटी व शर्ती वेबसाईटवर नमूद असतील निविदा फक्त इंटरनेट वरुन खरेदी करता येतील वइंटरनेटवरुन भरता येतील .सर्व कंत्राटदारांना Digital Signature चे रजिस्टेशन करणेअनिवार्य आहे.

ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई - निविदा प्रकाशित करणे | 11/06/2025 | 15.00 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोड करणे | 11/06/2025 | 15.00 |
| 3 | निविदा भरणे | 11/06/2025 | 15.00 |
| 4 | ई - निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 25/06/2025 | 15.00 |
| 5 | ई - निविदा उघडणे | 27/06/2025 | 15.00 |

| अ क्र | कामाचे नाव | इसारा रक्कम (EMD) | को-या निविदेची किंमत विक्री करा साहित + 28% GST | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| 01 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाड्यात दाखल करणे या कामासाठी कंत्राटी पद्धतीवर खाजगी अभिकर्ता नियुक्त करणे बाबत. | रु.95000/- | रु.5700/- | 24महीने |

**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड करीता

**प्रतिलीपी :-**

1. नोटीस बोर्ड ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड .
2. संपादक , दै.गोदातीर 2 दै. श्रमिक पत्र नांदेड यांना देऊन विनंती करण्यात येते की ,सदरील जाहिर निविदा सुचना आपल्या दि. 11/06/2025 रोजीच्या वर्तमान पत्रात कमीतकमी जागेत 15 X 12 छापून प्रसिध्द करावी व छापील दैनिक अंकाच्या दोन प्रतिसह देयक दोन प्रतित सादर करावे.
3. सिस्टम मॅनेजर, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील निवीदा मनपाच्यासंकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड करीता

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## कोंडवाडा विभाग

**मोकाट जनावरांचा बंदोबस्त**

**कोंडवाड्यात मोकाट जनावरे पकडून दाखल करण्याचे कामाचे निविदा अर्ज**

कामाचे नांव :-नांदेड वाघाळा शहर माहनगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणारी जनावरे पकडून कोंडवाडयातदाखल करणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्तांची नियुक्ती करणे बाबत.

निविदा धारकाचे नाव :- ------------------------------------------------

------------------------------------------------

पत्ता :- ------------------------------------------------

------------------------------------------------

निविदा जाहिरात दिनांक :- जा.क्र.नांवाशमनपा/कोंडवाडावि/19/2025 दिनांक :- 09.06.2025

निविदा अर्ज विक्री दिनांक :- दिनांक :- 11.06.2025 ते दि 25.06.2025

निविदा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक - :- दिनांक :-

कोरी निविदा अर्जाची किंमत :- **रु.5700/-**

निविदा पत्रक

**भाग** -1

प्रति,

मा.आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड .

विषय :- नांदेड वाघाळा शहर माहनगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाडयात दाखल करणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्ताची नियुक्ती करणे बाबत.

संदर्भ :- जाहिर निविदा सुचना जा.क्र.नांवाशमनपा/कोंडवाडावि/19 /2025 दि. 09/06/2025

महोदय ,

उपरोक्त विषयी संदर्भिय प्रसिध्द जाहिर निविदा सुचने प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाडयात दाखल करणेनिविदेतील शर्तीच्या नियम व अटीनुसार मी/आम्ही खालील प्रमाणे कागदपत्र सादर करीत आहे .

1.सुरक्षा ठेव अनामत रक्कम रु ------------------- /-अक्षरी रुपये ---------------------------फक्तचा धनाकर्ष बँकेचे नांव ---------------------------------------------------------------

2.संस्थेच्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र

3.संस्थेच्या कामाची क्षेमता (जसे कामगारांची संख्या, उपकरणे/ यंत्रे व ईतर साहित्याची तपशिल)

4. इतर.

निविदा धारक/अर्जदार

नांव ----------------------------------

संस्थेचे नाव -----------------------------

**पत्ता**---------------------------------------

**मो.क्र.**------------------------------------

**Email**----------------------------------

निविदा पत्रक

भाग-2

प्रति,

मा.आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड .

विषय :-<u>नांदेड वाघाळा शहर माहनगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या जनावरे पकडून कोंडवाड्यात दाखल करणेसाठी कंत्राटी पध्दतीवर खाजगी अभिकर्ताचे नियुक्ती करणे बाबत</u>.

संदर्भ :- जाहिर निविदा सुचना जा.क्र.नांवाशमनपा/कोंडवाडावि19//2025दि...09.062025.

महोदय ,

उपरोक्त विषयी संदर्भीय प्रसिध्द जाहिर निविदा सुचने प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाड्यात दाखल करणे ,निविदेतील शर्तीच्या नियम व अटीमान्य करुन वेळोवेळी दिलेल्या सुधारीत आदेशाचे/नियमांचे व सुचनांचे पाल करण्याचे अटीवर प्रथम दोन वर्षासाठी कंत्राट घेऊ इच्छितो .

| अ.क्र. | कामाचे नाव | मागणी केलेल्या कामाचे दर |
|---|---|---|
| 1 | पशुधन पर्यवेक्षक (LSS) यांचा मासिक मानधन | रु................ |
| 2 | सुपर वाईझर यांचा मासिक मानधन | रु................. |
| 3 | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाड्यात दाखल करणे व रस्त्यावरुन जनावरे हकालणे या कामासाठीप्रति माहची एक मजूराची मजूरी (किमान वेतन नियमानुसार) | रु................ |

निविदा धारक/अर्जदार

नांव --------------------------------

संस्थेचे नाव ----------------------------

पत्ता-----------------------------------

मो.क्र.--------------------------

Email ---------------------------------

**नियम व अटी**

1. प्रथम कामाची मुदत कार्यरंभ आदेश निर्गति केल्यापासुन 2 वर्ष कालावधीसाठी राहिल. कामाचे स्वरुप व काम समाधानकारक असल्यास मुदत वाढवून देण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहिल.
2. मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यात टाकणेया कामासाठी निविदाधारकांने निविदे सोबत कोरी निविदेची किंमत (Tender Fee)व इसारा रक्कम (EMD)ची रक्कम Online Payment Gatewayव्दारे भरणा करावी.
3. मोकाट जनावरे उदा. गाय,बैल ,म्हैस ,रेडा, गाढव ,शेळी पकडण्यासाठी लागणारे आवश्यक साहित्य, कंत्राटदाराने स्वतः उपलब्ध करुन घ्यावे मनपा प्रशासन मोकाट जनावरे कोंडवाडयात दाखल करण्याकरीता कॅटल कॅचर वाहन, वाहनचालक व इंधनसहीत उपलब्ध करुन देईल.
4. जनावरे पकडण्याची शास्त्रीय पध्दत असावी .कोणत्याही प्रकारच्या रसायनाचा वापर करता येणार नाही .पकडण्यात आलेल्या जनावरांची नोंद योग्य रितीने घ्यावी .यासाठी टॅग पध्दत अथवा मनपा निर्देशीत करील ती पध्दत अवलंबवावी लागेल .
5. किमान 15 कामगार व 01 पशुधन पर्यवेक्षक (LSS), 01 सुपरवाईझर अशा स्वरुपाचे मनुष्यबळ कोंडवाडया करिता उपलब्ध करुन देणे संसथेस बंधनकारक राहील.
6. पशुधन पर्यवेक्षक (LSS) या पदाकरीता डिप्लोमा व शैक्षणिक आर्हाताचे कागदपत्रे सोबत जोडणे बंधनकारक राहील
7. सुपरवाईझर या पदा करिता किमान शैक्षणिक आर्हाता 12 वी पास असणे आवश्यक राहील.
8. कामगारांना साप्ताहीक सुट्टी देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील व याकालावधीत गरजेनुसार कंत्राटदाराने पर्यायी व्यवस्था करुन अतिरीक्त कामगार उपलब्धकरुन देणे बंधनकारक राहील. .
9. मा.मंत्री/अती महत्वाचे व्यक्ती यांचे दौरे व धार्मिक सण, महोत्सव व मिरवनुका या प्रसंगी कार्यालयीन आदेशा प्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.
10. कामाचा व्याप पाहता कामगार कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहिल.
11. नांदेड शहरातील नागरीकांनी मनपा हद्दीत 24 तासात केंव्हाही मोकाट जनावारांची किंवा पिसाळलेल्या जनावारांची तक्रारी केल्यास ,तक्रार प्राप्त होताच त्वरीत त्याचा निपाटारा करणे संस्था चालकास बंधनकारक राहील .
12. नागरीकांनी केलेल्या तक्रारीचे निवारण संस्थेने त्वरीत न केल्यास संस्थेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल व त्यांनी ठेवलेली अनामत रक्कमेमधून किंवा त्यांच्या देयकामधून रक्कम वसूल केली जाईल .
13. सह कर्मचारी/कॅचर्स हे योग्य शिक्षीत व प्रशिक्षित असावेत .
14. संस्थेत काम करणा-या कर्मचा-यांना किमान वेतन कायदयानुसार वेतन दयावे लागेल .कामगार/कर्मचारी कायद्याचे पालन करावे लागेल त्यांचा विमा/संरक्षण/ESIC,EPF इत्यादी बाबींची पुर्तता करणे निविदा धारकास बंधनकारक राहील .
15. प्रती महिन्याच्या कामाचे देयक स्वतःह सादर करावे लागेल .आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कांही कारणास्तव देयकाची रक्कम देण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचा अधिकार निविदा धारकास राहणार नाही .निधीच्या उपलब्धतेप्रमाणे देयक अदा केले जातील. या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत काम बंद ठेवता येणार नाही तसेच संस्थेसकामगारांचे वेतन प्रती महिना किमान वेतनानुसार अदा करणे बंधनकारक राहील.
16. सदरील कामी कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम दिली जाणार नाही .
17. निविदा धारकास बालकामगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत बालकामगार लावता येणार नाही.
18. निविदा धारकांकडे काम करणा-या कामगारांना महानगरपालिका प्रशासन सेवेत कोणत्याही पदावर नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही व महापालिका सेवेत समावून घेतले जाणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही .
19. संस्थेस प्रतीमाह 60 मोकाट जनावरे बंदीस्त करणे अनिवार्य राहिल, या पेक्षा कमी मोकाट जनावरांची संख्या आढळून आल्यास संबंधीत संस्थेस देय होणा-यामासिक रक्कमेवर 10% दंड आकारण्यात येईल.
20. संस्थेस मोकाट जनावरे बंदीस्त करण्याचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
21. मोकाट जनावरे पकडताना कोणताही अपघात, धार्मिक भावना दुखावणे इ.घटना घडल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार असतिल.
22. गरजे प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाचे कर्मचारी/अधिकारी योग्य मदत सहकार्य करतील.
23. निविदा दाखल केल्यानंतर काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अथवा काम मुदतीपूर्व सोडण्यात आल्यास अनामत रक्कम जप्त करुन निविदा प्रक्रीयेसाठी झालेल्या खर्चाची रक्कम वसूल करुन संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल .

24. दैनिक कामाचा अहवाल कोडवाडा प्रमुख, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील .
25. पाळीव प्राणी जनावरा संबंधी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा 1973व इतर लागू असलेले सर्व संबंधीत नियम व अधिनियमातील अटींचे पालन करणे निविदा धारकास बंधनकारक राहील .
26. निविदा धारकाने सदर कामासाठी शारिरीक दृष्ट्या सुदृढ व सक्षम कामगार नेमावे.
27. लेबर ॲक्टचे पालन करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.
28. सदर कार्य हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे व सार्वजनिक हिताचे असल्यामुळे कंत्राटदाराला कोणत्याही परिस्थितीत महानरगपालिका ,नांदेडला सबळ कारणासह पुर्व सुचना न देता काम बंद करता येणार नाही अथवा एकतर्फी कंत्राट सोडून देता येणार नाही .तसे केल्यास कंत्राटदाराची सुरक्षा अनामत रक्कम व देय असलेली सर्व देयके जप्त करण्यात येतील व त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल व प्रसंगी कंत्राटदाराविरुध्द महापालिकेची फसवणूक केली म्हणून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल .
29. कंत्राटदाराच्या कामाबाबत तक्रार असल्यास व काम समाधानकारक न आढळल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचा किंवा कंत्राट रद्द करण्याचा अधिकार आयुक्त ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड यांचेकडे सुरक्षित आहे .
30. मोकाट जनावरे पकडणा-या कामगारांना युनीफॉर्म असावा व आपल्या नियुक्त केलेल्या सर्व कर्मचा-यांची नावाची यादी संपूर्ण पत्यासहीत कार्यालयात सादर करावी लागेल तसेच वेळोवेळी कामगार बदलले असतील तर सुची कार्यालयात सादर करावी लागेल व त्यांचे ओळखपत्र सादर करावे जसे मतदान ओळखपत्र ,आधार कार्ड,ड्रॉव्हींग लायसन्स इ .जनावरे पकडताना सर्व कर्मचा-यांचे ओळखपत्र सोबत असावे.
31. उपरोक्त सर्व अटी व वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेश/निर्देश/सुचनांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
32. मोकाट जनावरे कोंडवाडयात बंदिस्त करतांना कोणताही अनुचित प्रकार घडल्यास, कोणतीही जिवित अथवा वित्त हाणी झाल्यास त्यासंबंधित कंत्राटदार सर्वस्वी जबाबदार राहिल. तसेच आयुक्त निश्चीत करतील अशा स्वरुपाची नुकसान भरपाई करणेस संस्था बंधनकारक असेल.
33. निविदे बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. सक्षम अधिकारी म्हणून आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड राहील..

**आयुक्त**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड करीता